



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २८०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२२ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# गोळीबाराच्या घटनेनं उल्हासनगर हादरलं !

## ७ ते ८ जणांकडून अंदाधुंद फायरिंग दोघांचा मृत्यू, एक जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, उल्हासनगर :** गोळीबाराच्या घटनेनं उल्हासनगर हादरलं आहे. उल्हासनगरमधील कैलास कॉलनी चौकात गोळीबाराची घटना घडली आहे. सात राउंड फायर झाल्याची माहिती समोर येत आहे. या गोळीबारात दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे, तर एक जण जखमी झाला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेत जखम ीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की उल्हासनगरमधल्या कैलास नगर कॉलमधील चौकात ही घटना घडली आहे. दोन गटामधील जुन्या वादातून




ही घटना घडल्याची माहिती समोर येत आहे. दुचाकीवरून आठ ते दहा जण आले आणि त्यांनी या ठिकाणी अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारामध्ये तब्बल सात राऊंड फायर झाले. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण जखमी झाला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच तातडीने पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडू देण्यात आली आहे.

**जुन्या वादातून गोळीबाराची घटना**

दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार जुन्या वादातून ही घटना घडली आहे. दोन गटातील जुना वाद उफाळून आला आणि त्यातून ही गोळीबाराची घटना घडली आहे. सात ते आठ जण दुचाकीवरून आले, त्यांनी उल्हासनगरमधल्या चौकात अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण जखमी झाला आहे. जखमीवर रुग्णालयात उपाचार सुरू आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान घटनाची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

**नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण**

दरम्यान या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अचानक झालेल्या या गोळीबाराच्या घटनेमुळे नागरिक चांगलेच हादरले आहेत. भर चौकात ही घटना घडली आहे.

## जामिनावर बाहेर असलेल्या २७० गुन्हेगारांची एसपी नोपाणीकडून परेड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात गुन्हेगारीने डोके वर काढले आहे, या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक आयुष नोपानी यांनी प्रयोग करीत चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २७० जामिनावर बाहेर असलेल्या गुन्हेगारांची परेड घेतली. जामिनाच्या अटीचा भंग करु नका अन्यथा कठोर कारवाई केल्या जाणार असा इशारा पोलीस अधिक्षक नोपानी यांनी दिला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील खून व खूनाचा प्रयत्न करणाऱ्या जाम्नावर बाहेर असलेल्या एकूण २७० सराईत गुन्हेगारांची पोलीस अधीक्षक नोपानी यांच्या उपस्थितीत ओळख परेड घेण्यात आली. उपस्थित गुन्हेगारांना जामिनाच्या अटी व शर्थीचे पालन करावे, अन्यथा पोलीस न्यायालयात धाव घेत तुमची जामीन रद्द करणार असा इशारा यावेळी देण्यात आला. परेड दरम्यान ज्या गुन्हेगारांवर यापूर्वी प्रतिबंधक कारवाई झाली नाही त्यांची यादी तयार करीत तातडीने प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेकार्डवरील गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम ठाणे प्रमुखांना सूचना देण्यात आल्या. रेकार्डवरील गुन्हेगार पुन्हा गुन्हेगारीत सक्रीय होणार नाही याकडे लक्ष ठेवावे. नागरिकांचेया सुरक्षिततेबाबत कसलीही तडजोड केल्या जाणार नाही, कायद्याचे उल्लंघन केल्यास कठोर कायदेशीर एमपीडीए व तडीपारीची कारवाई कपण्यात येणार असा गुन्हेगारांना पोलीस अधीक्षक नोपानी यांनी इशारा दिला आहे.

## ‘दिल्ली दरबार’ च्या उड्डाणपुलासाठी १० जूनची डेडलाईन!

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२१, मिरा-भाईंदर :** दहिसर ते गुजरात राष्ट्रीय महामार्गावरील रखडलेली कामे आणि उड्डाणपुलाच्या दुरवस्थेवरून आगामी पावसाळ्यात नागरिकांना वाहतूककोंडी आणि जलमय रस्त्यांचा सामना करावा लागू नये, यासाठी दिनांक २१.०५.२०२७ रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आक्रमक पवित्रा घेतला. दिल्ली दरबार हॉटेल परिसरातील उड्डाणपुलाच्या कामाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करत मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना १० जूनपर्यंत काम पूर्ण करण्याची डेडलाईन दिली आहे.

**केंद्रीय निधीचा गैरवापर? सरनाईकांचे गडकरींना पत्र**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून दहिसर ते गुजरात नॅशनल हायवेदरम्यानच्या रस्ते विकास आणि उड्डाणपुलासाठी तब्बल ६०० कोटी रुपयांचा भव्य निधी मंजूर करण्यात आला



होता. या निधीतून काँक्रीटीकरण आणि उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट आणि संथ गतीने सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत होत्या.

या गंभीर बाबीची दखल घेत मंत्री सरनाईक यांनी थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे दाद मागितली होती. अधिकाऱ्यांनी 'काम अद्याप प्रगतीपथावर आहे' अशी तांत्रिक उत्तरे दिल्यानंतर मंत्री सरनाईक यांनी आज स्वतः मैदानात उतरून 'ऑन द स्पॉट' पाहणी दौरा केलादिल्ली दरबार हॉटेल परिसर हा मिरा-भाईंदरमधील सर्वात गजबजलेला आणि वाहतूककोंडीचा मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे. त्यातच हा महामार्ग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून असल्याने, पावसाळ्यात डोंगरावरून येणारा पाण्याचा प्रचंड प्रवाह थेट रस्त्यावर येतो. योग्य निचरा न झाल्याने संपूर्ण परिसर जलमय होतो आणि मुंबई-अहमदाबाद हायवेची कोंडी होते. या पार्श्वभूमीवर बोलताना सरनाईक म्हणाले कि, पावसाळा तोंडावर आला आहे. हा पूल आणि रस्ता वेळेत पूर्ण झाला नाही, तर मिरा-भाईंदरकरांना नाहक मनस्ताप सहन करावा लागेल. म्हणूनच १० जूनपर्यंत हे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना मी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांना दिल्या आहेत.

महामार्गाच्या पाहणीसोबतच मंत्री सरनाईक यांनी परिसरातील नैसर्गिक नाल्यांचीही पाहणी केली. डोंगरावरून येणारे पाणी नाल्यांद्वारे वेळेत वाहून जावे यासाठी त्यांनी थेट मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि संबंधित कर्मचाऱ्यांना फोनवरून संपर्क साधला. पावसाळ्यापूर्वी तात्काळ नालेसफाई करून पाण्याचा प्रवाह मोकळा करावा, अशा कडक सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## माथेरानमध्ये भीषण पाणीटंचाई पर्यटन हंगामापूर्वी नागरिक त्रस्त



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२१, माथेरान :** माथेरानचा १७६ वा वाढदिवस उत्साहात साजरा होत असताना शहरात भीषण पाणीटंचाई निम र्ण झाली आहे. गेल्या तीन दिवसांपासून नेरळ येथील पंपिंग व्यवस्था वारंवार बंद पडत असल्याने अनेक भागांमध्ये सलग दोन दिवस पाणीपुरवठा झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शरलोट तलावातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटल्याने जॅकवेलमध्ये पुरेसे पाणी साठत नसून पंपिंग कमी प्रमाणात होत आहे. त्यातच नेरळ-माथेरान घाटातील पंप आणि स्टार्टर क्षमतेबाबत गंभीर तांत्रिक त्रुटी असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्ट यांनी केला आहे. चुकीच्या क्षमतेचे स्टार्टर बसविल्यामुळे पंप वारंवार जळत असल्याचा दावा त्यांनी केला.आगामी शुक्रवारपासून पर्यटन हंगामाला वेग येणार असून अनेक हॉटेल, रिसॉर्ट आणि होमस्टे पर्यटक येऊ लागले आहेत. पुढील १५ ते २० दिवस पर्यटकांची मोठी गर्दी अपेक्षित असताना पाणीपुरवठा कोलमडल्याने पर्यटन व्यवसायिकांची चिंता वाढली आहे.दरम्यान, जुम्मापट्टी-कुंभे परिसरातील जुने पंप, वारंवार होणारे लाईट फेल्युअर आणि मेन रायझिंग लाईनवरील कथित बेकायदेशीर नळजोडण्या हेही समस्येचे मोठे कारण असल्याचा आरोप होत आहे. या अनधिकृत जोडण्या हटवल्यास कमी वेळ पंपिंग करूनही मोठ्या प्रमाणात पाणी माथेरानला उपलब्ध होऊ शकते, असा दावा करण्यात आला आहे. या गंभीर प्रश्नावर नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, मुख्याधिकारी राहुल इंगळे, मुख्याधिकारी सिताराम कुंभार, उपनगराध्यक्ष संतोष शेलार तसेच सचिन दाभेकर यांनी सातत्याने एमजेपीकडे पाठपुरावा केला असल्याची माहिती आहे. मात्र संबंधित अधिकारी वर्गाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. माथेरानचा वाढदिवस जल्लोषात साजरा होत असताना नागरिकांना पाण्यासाठी वाट पाहावी लागणे दुर्दैवी आहे, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली असून प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## नाशिकमध्ये ज्वेलर्समध्ये दरोडा टाकणाऱ्यांना पंजाबमधून बेड्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नाशिक :** पंचवटी परिसरातील हिरवाडी येथील न्यू समृद्धी ज्वेलर्स येथे दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या ६ अज्ञातांपैकी २ जणांना नाशिक पोलिसांनी तब्बल ५०० CCTV तपासून पंजाब येथून अटक केली आहे. नाशिकच्या हिरावाडी परिसरात असलेल्या न्यू समृद्धी ज्वेलर्स येथे १५ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ६ अज्ञातांनी शसस्त्र दरोडा टाकला होता.

दुकानातील महिला व्यावसायिक आणि काम गारांनी प्रतिकार केल्याने दरोडेखोरांचा हा प्रयत्न फसला होता. या घटनेत ज्वेलर्स दुकानातील एक कामगार हे जखमी देखील झाले होते. या प्रकरणी पंचवटी पोलिसांत दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि पोलिसांकडून अज्ञात दरोडेखोरांचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली.

सुरुवातीला कुठलाही सुगावा लागत नसल्याने पोलिसांसमोर या दरोडेखोरांना पकडण्याचे मोठं आव्हान होतं. मात्र नाशिक शहर पोलीस गुन्हे शाखा १, २ आणि पंचवटी पोलिसांनी तब्बल ५०० सीसीटीव्ही तपासून त्याआधारे संशयतांचा सुगावा



लावला आणि थेट पंजाब येथून या गुन्ह्यातील दोघा संशयतांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. दरोडा टाकणाऱ्यांमध्ये १ संशयित हा पंजाबच्या मोहाल तर एक जण पटियाला येथील आहे. धक्कादायक बाब म्हणजे गुन्ह्यातील अटक केलेल्यांपैकी एक संशयित हा माजी सैनिक आहे. रणजीत सिंह असे त्याचे नाव आहे. अटक केलेले दोघे जण हे सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

**असा रचला प्लॅन !**

दरोड्यामध्ये सहभागी असलेले आणि अटक केलेलं दोघे हे २०१० मध्ये अंबाला येथील जेलमध्ये होते. तिथेच त्यांची एकमेकांशी ओळख झाली आणि नंतर ते दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. दोघांनी दरोड्याचा प्लॅन केला. त्यांनंतर दोघे पंजाब येथून निघाले तेव्हाच त्यांनी त्यांचे मोबाईल हे बंद केले होते. पंजाबहून त्यांनी थेट मुंबई गाठले आणि म ुंबईनंतर त्यांनी नाशिक गाठून येथे एक लॉजवरती ते वास्तव्यास होते.

पंचवटी परिसरातील हिरावाडी येथील न्यू समृद्धी ज्वेलर्सची आणि परिसराची त्यांनी रेकी केली आणि दरोड्याचा प्लॅन रचला. त्यांनंतर त्यांनी शहर परिसरातूनच दोन दुचाकी चोरल्या आणि आपल्या इतर ४ साथीदारांसोबत दोन दुचाकीहून येत हा अयशस्वी दरोडा टाकला.

**घटनेचा सीसीटीव्ही झालेला व्हायरल**

ज्वेलर्सच्या दुकानातील दरोड्याचा सीसीटीव्ही फुटेज हा सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. संबंधित घटना किती गंभीर आहे हे संबंधित व्हिडीओतून स्पष्ट झालं होतं. या घटनेमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. नाशिकमध्ये सातत्याने गुन्हेगारीच्या घटना समोर येत असल्याने अनेकांकडून चिंता व्यक्त केली जात होती. अखेर या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना पंजाबमधून अटक करत मोठी कारवाई केली आहे.

## पेट्रोलपंपांवर ठणठणाट! बुलढाणा जिल्ह्यात स्थिती बिकट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलढाणा :** सध्या बुलढाणा जिल्ह्यात पेट्रोल- डिझेलचा तुटवडा जाणवत असल्याने वाहनांची चाके थांबली आहेत. अनेक पेट्रोलपंपांवर इंधनाच्या टाक्या कोरड्या पडल्या आहेत, तर उपलब्ध असलेल्या पंपांवर पेट्रोल, डिझेलसाठी गर्दी वाढू लागली आहे. वाहनधारकांसोबतच ट्रॅक्टरला डिझेल घेण्यासाठी शेतकऱ्यांनी कॅनच्या रांगा लावल्या आहेत. वाशीममध्येही हीच स्थिती आहे. यातून वादावादी आणि हाणामारीचेही प्रसंग उद्भवत असल्याने शासनाने इंधनाची सोय करण्याची मागणी होत आहे. सध्या खरीप पेरणीचा हंगाम तोंडावर आला आहे. पेरणीपूर्व म शागतीची कामे सुरू आहेत. प्रत्येक शेतकऱ्यांकडे बैल नसल्याने ट्रॅक्टरच्या साह्याने मशागतीसोबतच पेरणीची कामे केली जातात. मात्र, आजघडीला डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली. डिझेलअभावी ट्रॅक्टर उभे असल्याने व्यावसायिकही अडचणीत सापडले आहेत. डिझेल नसल्याने हे सारे पेट्रोलपंपांपर्यंत ट्रॅक्टर आणू शकत नाहीत.

**पंपांची संख्या १६६ :** लाखोंच्या संख्येने असलेल्या वाहनांना इंधन पुरवठा करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात १६६ पेट्रोलपंप कार्यान्वित आहेत. भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑइल, जीओ आणि नायरा अशा पाच कंपन्यांच्या पेट्रोलपंपांचा यामध्ये समावेश आहे.

**अशी आहे इंधन आवक :** बुलढाणा जिल्ह्यात मंगळवारी ९६० केएल पेट्रोल आणि १५७२ केएल डिझेलची आवक झाली आहे. गायगाव डेपोत हे इंधन उतरविण्यात आले. तेथून त्याचे वितरण सुरू झाले असून, विविध पेट्रोलपंपांवरदेखील त्याची उचल झाली आहे. तर काही पेट्रोलपंपांवर मंगळवारी सायंकाळपर्यंत इंधन पोहोचेल, अशी माहिती पुरवठा विभागाने दिली आहे.




## ममदानींचे अर्थकारण

गेल्याच आठवड्यात अमेरिकेत न्यूयॉर्कचे महापौर, ३४ वर्षीय झोहरान ममदानी यांनी निवडून आल्यानंतरचा त्यांचा पहिलाच अर्थसंकल्प जाहीर केला. १२५ अब्ज डॉलरच्या या अर्थसंकल्पात त्यांनी या आधीच्या अर्थसंकल्पात मावळते महापौर एरिक अॅडम्स यांना अपेक्षित असलेली १२ अब्ज डॉलरची तूट पूर्णपणे भरून काढण्याची किमया केली; आणि तेही कुठल्याही सार्वजनिक सुविधांमध्ये कपात न करता किंवा सर्वसामान्यांवर कुठल्याही अतिरिक्त करांचा बोजा न वाढवता! त्यामुळे ममदानींच्या आर्थिक धोरणाविषयी सगळीकडे उत्सुकता निर्माण झाली आहे.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या समाजवादी विचारसरणीचे ममदानी यांनी निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी जाहीरनाम्यामध्ये फुकट बस प्रवास, मुलांना पाच वर्षांपर्यंत फुकट बालसंगोपनाची सोय, घरभाड्यांवर नियंत्रण, स्वस्त घरांची निर्मिती, सरकारी किराणा मालाची दुकाने इत्यादी अनेक लोकप्रिय घोषणांचा समावेश केला होता. आणि यासाठी लागणाऱ्या भांडवलाची व्यवस्था दोन दशलक्ष डॉलरपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या अतिश्रीमंत नागरिकांवरील कर वाढवून होणार होती. त्यांच्या या करवाढीच्या प्रस्तावाला प्रचंड विरोध झाला होता. त्यांच्या डेमोक्रॅटिक पक्षाच्याच काही सदस्यांनी अशा करप्रणालीमुळे निवडणुकीच्या खर्चासाठी आवश्यक देणग्या मिळायला अडचण येईल असे मत व्यक्त करून या निर्णयाच्या समर्थनास नकार दिला होता. त्यामुळे निवडून येण्यासाठी दिलेली ही सगळी आश्वासने पूर्ण करण्यासाठी ते आवश्यक निधीची व्यवस्था कुठून करणार, असा प्रश्न त्यांच्या विरोधी रिपब्लिकन पक्षाने उपस्थित केला होता. पण या सगळ्या शंका खोट्या ठरवून ममदानींनी अर्थसंकल्पातील तूट भरून काढायची कामगिरी करून दाखवली आहे. आणि तेदेखील आपत्कालीन निधी किंवा निवृत्त लोकांच्या वैद्यकीय सुरक्षा निधीमध्ये कुठलीही कपात न करता!

अर्थात अशा प्रकारे अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी ममदानींनी निधी जमवण्याचे नवीन मार्ग शोधले आणि सध्या होत असलेल्या खर्चात कशी बचत करता येईल, याचा विचार केला. यासाठी प्रस्तावित महत्त्वाचे बदल म्हणजे न्यूयॉर्क राज्याकडून घेण्यात येणारी साधारण आठ अब्ज डॉलरची मदत. न्यूयॉर्क राज्यातही ममदानींच्याच डेमोक्रॅटिक पक्षाचे सरकार आहे; त्यामुळे अशी मदत मिळवणे सोपे झाले असावे. आपल्याकडे याला 'डबल इंजिनच्या सरकार'मुळे होणारा फायदा म्हणतात. तसेच सरसकट अतिश्रीमंत नागरिकांवरील करवाढ मागे घेऊन ५० लाख डॉलरपेक्षा जास्त किमतीच्या रिकाम्या घरांवरील मालमत्ता कर वाढवायची योजना आखली गेली आहे, ज्यामुळे ५० कोटी डॉलरचा नवीन महसूल मिळणार आहे. त्यासाठी अशा घरांच्या मूल्यमापनाची प्रचलित पद्धत – ज्यामध्ये घराला मिळू शकणाऱ्या भाड्यावरून त्याचे मूल्य ठरवले जाते – बदलून यापुढे घरांच्या बाजारभावावर हा वाढीव मालमत्ता कर आकारला जाईल. खर्च कमी करण्यासाठी सरकारी यंत्रणा जास्त कार्यक्षम पद्धतीने चालवून साधारण दोन अब्ज डॉलरची बचत करण्यात येणार आहे. यामध्ये ओव्हरटाईमवर होणारा खर्च कमी करणे, कंत्राटदारांशी कमी दरात करार, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर आणि फार वापरात नसलेल्या योजना बंद करणे इत्यादींचा समावेश आहे. तसेच न्यूयॉर्क शहराच्या म्युनिसिपल पेन्शन फंडांमध्ये सरकारतर्फे करण्यात येणाऱ्या गुंतवणूक साहाय्याची कालमर्यादा पाच वर्षांनी वाढवून २०३७ पर्यंत नेल्यामुळे या वर्षी १.६ अब्ज डॉलरची कमी तरतूद करावी लागणार आहे. यामुळे या वर्षीच्या खर्चाची तरतूद काही प्रमाणात २०३२ ते २०३७ मधील करदात्यांकडून मिळणाऱ्या महसुलातून होणार आहे. हा प्रस्ताव म्हणजे आजचे मरण उद्यावर ढकलण्यासारखे आहे, अशी टीका होत आहे. याच्या अंमलबजावणीसाठी शहरातील पाचपैकी कमीत कमी चार पेन्शन फंड या योजनेचा स्वीकार करतात का (योजना अंमलात येण्यासाठी ते आवश्यक आहे) ते पाहावे लागेल.

या अर्थसंकल्पाला न्यूयॉर्क राज्याची राजधानी असलेल्या अल्बनी येथील लोकप्रतिनिधींची मान्यता; तसेच पेन्शन बोर्डाची सहमती लागेल. हे अडथळे पार करणे सोपे नाही. मुख्यत्वे करून आजची तूट भरून काढण्यासाठी पुढील वर्षांच्या अर्थसंकल्पावर येऊ शकणारा भार आक्षेपार्ह ठरू शकेल. ३० जूनपर्यंत या मान्यता मिळवणे गरजेचे आहे. ममदानी हे यशस्वीरीत्या करू शकतात का, याकडे अर्थतज्ज्ञांचे आणि राजकीय निरीक्षकांचे लक्ष आहे. पण त्याबरोबरच 'ममदानी अर्थकारणा'चा हा चाकोरीबाहेरचा दृष्टिकोन जगात इतर कुठे वापरता येईल का यावरही चर्चा सुरू आहे.

**– समीर कुळकर्णी**

# मुंबईतील अन्य रेल्वे स्थानक परिसरातील अवैध बांधकामेही हटवावीत !

मुंबईतील वांद्रे रेल्वेस्थानक परिसरात गेल्या काही वर्षांत निर्माण झालेल्या अवैध वस्त्या आणि अनधिकृत बांधकामे तेथून मार्गक्रमण करणाऱ्या कोणाच्याही नजरेतून सुटलेली नाहीत. या अवैध वस्त्यामुळे रेल्वे स्थानक परिसराला अत्यंत बकाल स्वरूप आले होते. एकगठ्ठा मताच्या लाचारीपोटी तेथील स्थानिक राज्यकर्त्यांनी या अवैध वस्त्यांना आजतागायत पाठबळ दिले होते.

या झोपडपट्यांत राहणारे गर्दुल्ले आणि दारुडे रात्री अपरात्री स्टेशन परिसरांत वावरताना दिसायचे परिणामी रात्रीच्या वेळेत प्रवास करणाऱ्या महिलांना जीव मुठीत घेऊन स्टेशनबाहेर पडावे लागायचे. स्टेशनबाहेर यांचेच राज्य असायचे. स्टेशन परिसरही त्यामुळे गलिच्छ झालेला असायचा. स्टेशनबाहेर दरवेळेस कोणाची ना कोणाची भांडणे, मारामाऱ्या, शिवीगाळ पाहायला मिळायची. सुजाण नागरिकांनी अनेकदा याबाबत रेल्वे प्रशासनाला, स्थानिक पोलिसांना जेव्हा जेव्हा सूचित केले, तक्रारी दाखल केल्या तेव्हा तात्पुरती तोंडदेखली कारवाई होत असे, पुन्हा काही दिवसांनी परिस्थिती जैसे थे व्हायची.

काही दिवसांपूर्वी एका सजग नागरिकाने वांद्रे रेल्वेस्थानक परिसरातील झोपडपट्टीच्या अतिक्रमणाचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांत प्रसारित केला. ज्याची गंभीर दखल घेत रेल्वे प्रशासनाने रेल्वे स्थानक परिसरातील अवैध बांधकामांवर थेट बुलडोझर चालवले. ३ मजली पत्र्याच्या घरांसह अनधिकृत झोपडपट्या जमीनदोस्त केल्या. सलग दुसऱ्या दिवशीही ही तोडक कारवाई सुरु होती.

दुसऱ्या दिवशी याच परिसरातील अवैध प्रार्थनास्थळावर बुलडोझर फिरवला जात असताना स्थानिकांकडून पोलिसांवर बाटल्यांसह जोरदार दगडफेक करण्यात आली. सरकारी जमिनी हडप करून त्यावर अवैध बांधकामे उभारायची, अनधिकृत वस्त्या निर्माण करायच्या आणि प्रशासनाने कारवाई केल्यावर त्यांच्यावर दगडफेक करायची. चोर तर चोर वर शिरजोर अशी यांची वृत्ती आहे. मोठ्या प्रमाणात जमाव निर्माण झाल्याने अखेर पोलिसांनी अधिक कुमक मागवून जमावाला पांगवण्यासाठी लाठीमार केला. त्याचवेळी दंगलविरोधी पथकही परिसरात दाखल झाले.

वांद्रे रेल्वे स्थानक परिसरात अवैध बांधकाम हटवण्यासाठी करण्यात आलेली कारवाई मुंबईतील सर्वात मोठी कारवाई असल्याचे मानले जात आहे. रेल्वे प्रशासन आणि पोलीस यांनी केलेल्या या कारवाईबाबत मुंबईत सर्वत्र समाधान व्यक्त केले जात असून आता मुंबईतील कुर्ला, गोवंडी, मानखुर्द यांसासह अन्य काही रेल्वे स्थानक परिसरात निर्माण झालेल्या अवैध झोपड्या, दुकाने, टपऱ्या यांवरसुद्धा लवकरात लवकर बुलडोझर फिरवून रेल्वे प्रशासनाने रेल्वेमार्गाने प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांना भयमुक्त करावे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# दहशतवाद वैश्विक समस्या

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ मध्ये तामिळनाडू मधील श्रीपेराम्बदूर येथे एल टी टी ई ( लिट्टे ) च्या दहशतवाद्यांनी एका प्रचारसभेत बॉम्बस्फोट करून हत्या केली. राजीव गांधी यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरुन गेला. १९८४ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली त्यानंतर भारताला बसलेला हा दुसरा हादरा होता.

हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. या हल्ल्याने भारतच नव्हे तर संपूर्ण विश्वच दहशतवाद्यांच्या दहशतीखाली आले. २१ मे १९९१ पासून सुरू झालेला दहशतवाद्यांचा हा धुमाकूळ आजही जगभरात सुरू आहे म्हणूनच २१ मे हा राजीव गांधी यांचा स्मृतिदिन संपूर्ण जगात दहशतवादी विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. सद्य स्थितीत जगभरात वेगवेगळ्या प्रकारचा दहशतवाद पसरला आहे. दहशतवादाने संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील एकही देश आज दहशतवादापासून मुक्त नाही. दहशतवाद आज सर्व देशांचे दार ठोठावीत आहे.

अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला देखील दहशतवादाचा तडाखा बसला आहे. दहशतवादी हा शब्द उच्चारायला जरी वेगळा वाटत असला तरी याचे नेतृत्व करणारे लोक हे अशिक्षित नसून उच्चशिक्षित असतात. देव व धर्माच्या नावाखाली तरुणांचे ब्रेन वाशिंग करुन हे लोक श्रध्येच्या नावाखाली जगभरात दहशतवाद पसरवीत आहेत. दहशतवाद म्हणजे लोकशाहीच्या विरोधातील बाजू त्यामुळे दहशतवाद हा लोकशाही शासनव्यसवस्थेत अडथळे निर्माण करतो. सामाजिक असंतुलन हे दहशतवादाचे मूळ आहे.

सत्तेची हाव, अधिकार नाकारणे, स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला ओलीस धरणे, धर्मसत्ता लादणे, जाती भिन्नता, धर्मभेद तसेच समाजातील भिन्न संस्कृतीचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्यायव्यवस्थेखाली राहायला नाखूष असतात. बरेचदा राज्यकर्त्यांचे एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होते व त्या भागाची प्रगती खुंटते त्यामुळे एकाच देशात आर्थिक भेदभाव निर्माण हातात आणि त्यातून आतंकवादाचा जन्म होतो. आपण सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. दहशतवाद हा मानवजातीचा शत्रू आहे. यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून प्रतिकारासाठी सज्ज असले पाहिजे.

जागतिक दहशतवादाचा सगळ्यात मोठा हादरा भारताला बसला आहे, त्यामुळे दहशतवाद नष्ट करणे ही देशातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारताला बसली आहे. दहशतवादाने भारताला दोन कर्तव्यदक्ष पंतप्रधानांना गमवावे लागले आहे. अगदी




सर्वसामान्य नागरिकांपासून पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच दहशतवाद्यांनी लक्ष केले आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून भारत दहशतवादाचा झळा सोसतोय त्यात देशातील लाखो निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे आजही जात आहे. मागील वर्षी २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना ठार केले.

त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात संतापाची लाट उसळली होती. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवून त्याचा बदला घेतला मात्र तरीही दहशतवादी त्यातून धडा घेतील असे वाटत नाही. ते दहशतवाद पसरवतच राहतील. दहशतवाद संपवण्याची जबाबदारी केवळ सरकारची, सुरक्षा यंत्रणेची किंवा लष्कराची नाही तर देशातील प्रत्येक नागरिकांची आहे. देशातील नागरिकांनीही नेहमी सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. आपल्या आसपास कोठेही काही संशयास्पद आढळले तर नागरिकांची त्यांची माहिती सुरक्षा यंत्रणांना द्यावी. सुरक्षा यंत्रणेइतकेच नागरिकांनीही सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. दहशतवादाची झळ जशी भारताला बसली आहे तशीच ती जगालाही बसली आहे. दहशतवादाने केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जग पोळले आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, रशिया, इस्राईल, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या जगातील बलाढ्य देशांनाही दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे. केवळ बलाढ्य देशच नव्हे तर जगातील सर्वच लहान मोठ्या देशांना दहशतवादाची झळ बसत आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करणे ही कोणा एका देशाची नाही तर जगातील सर्व देशांची जबाबदारी आहे.

दहशतवादाची समस्या ही वैश्विक आहे म्हणून दहशतवादाशी लढायचे असेल तर संपूर्ण जगाला एक व्हावेच लागेल त्यासाठी अमेरिका, रशिया सारख्या महासत्ता असलेल्या देशांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादा विरुद्ध युद्ध पुकारावे. दहशतवादी हे मानवतेचे शत्रू आहे. त्यामुळे संपूर्ण जगानेच एक होऊन या मानवतेच्या शत्रूंचा मुकाबला करायला हवा.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## प्रुफ

भिंतीचे काढा कान
खोली साऊंड फ्रुफ
करत असता चर्चा
सीसीटिव्ही हवे चूप

बाहेर नसे बोलायचे
तोंडाले बांधा कुलूप
रुळाचा नको ध्वनी
गाड्या बदलता लूप

पक्की माणसे तीचं
कच्ची ठेवती प्रारुप
बंद दाराआड घडले
बाहेर ये वेगळे रूप

आतल्या निर्णयाशी
कोण राहतोयं तद्रुप
हस–या चेह–यामागे
चेहरा विचीत्र विद्रुप

मिडीयाला सांगता
लावता मसाला तूप
मूळ मुद्दा लपवावा
बोलावे भरपूर खूप

मिडीयाले उत्सुकता
वाटत राहीलं अप्रूप
चालत राही त्यांना
असता सर्व सुखरुप

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# ग्लोईंग स्किनसाठी आंब्याचा फेसपॅक !

**आंबा हे एक असे फळ आहे जे सर्वांना खायला आवडते. पण तुम्हाला माहित आहे का की आंबा हा तुमच्या त्वचेला चमकदार देखील बनवू शकतो. या लेखात आपण आंब्याचा फेस पॅक कसा बनवायचा ते जाणून घेऊयात...**

उन्हाळ्यात बाजारांमध्ये गोड आणि रसाळ आंबे येतात. त्यात आंबा असा एक फळ आहे जो क्वचितच कोणाला आवडतं नसेल, बाकी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना आंबा खायला खुप आवडतो. तुम्हीही आंबाप्रेमी असाल तर तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की तुमचा आवडता आंबा केवळ खायलाच चविष्ट नाही, तर तो तुमच्या त्वचेला चमकदार करण्यासही खूप उपयुक्त आहे. कारण आंब्यामध्ये असे अनेक घटक असतात, जे त्वचेला चमकदार आणि तरुण बनवतात. आंब्याच्या हंगामात तुम्ही त्याचा फेस पॅक घरी बनवून त्वचेला लावू शकता, ज्यामुळे तुम्हाला त्वचेशी संबंधित अनेक फायदे मिळतील. चला तर मग आजच्या लेखात आपण आंब्याचा फेसपॅक आणि त्याचे त्वचेला होणाऱ्या फायद्यांबद्दल जाणून घेऊयात.

**त्वचेसाठी आंब्याचे फायदे !**

आंब्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे तुमची त्वचा आर्द्र राहण्यास मदत होते. तर आंब्यांमध्ये व्हिटॅमिन ए, सी, के आणि ई, तसेच बीटा-कॅरोटीन देखील असतात, जे तुमच्या त्वचेचे पोषण करतात आणि निरोगी, चमकदार त्वचेसाठी प्रोत्साहन देतात. आंब्यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स अकाली वृद्धत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या फ्री रॅडिकल्सशी लढण्यास मदत करतात.

आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे त्वचा उजळ करण्यास मदत करते. तसेच त्वचेवरील काळे डाग कमी करण्यास आणि त्वचेचा रंग एकसमान करण्यासही मदत करू शकते.



आंब्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे मुरुमांमुळे होणारी त्वचेची जळजळ शांत करू शकतात आणि लालसरपणा कमी करू शकतात.

आंब्यामध्ये असलेल्या व्हिटॅमिन ए मुळे कोलेजनच्या निर्मितीस मदत होते, जे त्वचेची लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी आणि ती सैल पडण्यापासून रोखण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

*** घरीच आंब्याचे फेस पॅक बनवा**

**साहित्य :**

२ मोठे चमचे पिकलेल्या आंब्याचा गर
१ मोठा चमचा साधं दही
१ चमचा चिया बियाणे

**आंब्याचा फेसपॅक बनवण्याची पद्धत–**

एका भांड्यात पिकलेल्या आंब्याचा गर घ्या. त्यात दही आणि चिया सीड्स टाकून पेस्ट तयार होईपर्यंत चांगले फेटून घ्या. हा आंब्याचा फेस पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर लावा, डोळ्यांच्या आजूबाजूचा भाग अधिक नाजूक असल्याने तो लावणे टाळा. १५ ते २० मिनिटांनंतर तो धुवून टाका. यामुळे तुमच्या त्वचेवर नैसर्गिक चमक येईल.

आंब्यापासून तुम्ही हे काही फेसपॅक देखील बनवून चेहऱ्यावर लावू शकता.

**आंबा, मध आणि ओट्सचा फेस पॅक**
**२ मोठे चमचे पिकलेल्या आंब्याचा गर**
**१ मोठा चमचा ओट्स**
**फेसपॅक बनवण्याची पद्धत–**

ओट्सची बारीक पूड करून घ्या. या पूडमध्ये मध टाका. आंब्याच्या गरासोबत हे मिश्रण एकत्र करून पेस्ट बनवा. हा पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर लावा आणि हलक्या गोलाकार हालचालींनी मसाज करा. २० मिनिटे तसाच राहू द्या, त्यानंतर कोमट पाण्याने धुवा. यामुळे त्वचेवरील डाग कमी होण्यास मदत होईल.

**आंबा आणि मधाचा फेस पॅक**

**साहित्य :**

**२ मोठे चमचे पिकलेल्या आंब्याचा गर १ टेबलस्पून मध**

ग्लोईंग स्किनसाठी फक्त १० मिनिटांत घरच्या घरी बनवा आंब्याचा फेसपॅक, तुम्हाला मिळेल चमकदार त्वचा

एका भांड्यात आंब्याचा गर आणि मध एकत्र करून चांगले मिक्स करून घ्या. हे मिश्रण तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा, १५ मिनिटे सुकू द्या, त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे तुमची त्वचा मऊ आणि चमकदार होईल.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कृषीदूतांचे निवळी येथे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२१, पाटण (सातारा) :** डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत असलेल्या गोविंदरावजी निकम कृषी महाविद्यालय, मांडकी-पालवण येथील बी.एस्सी. (कृषी) शाखेच्या अंतिम वर्षाच्या कृषीदूतांनी 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' रावे कार्यक्रमांतर्गत निवळी येथे ग्राम संलग्नावस्था परिचय कार्यक्रम अत्यंत उत्साहात आयोजित केला होता. यावेळी गावकऱ्यांनी सर्व कृषीदूतांचे गावात उत्साही स्वागत केले. कार्यक्रमाची रीतसर सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर कृषीदूतांनी उपस्थित गावकऱ्यांना या संपूर्ण उपक्रमाचा मुख्य उद्देश आणि आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.कृषीदूतांनी ग्रामस्थांशी संवाद साधताना स्पष्ट केले की, या उपक्रम ांतर्गत निवळीतील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेती करण्याच्या नवीन आणि प्रगत पद्धतींची माहिती देणे. कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आधारित शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा व अख चा वापर कसा करावा, याचे मार्गदर्शन केले शेतकऱ्यांसाठी विशेष कृषी मेळाव्याचे आयोजन करणे, गावातील लहान मुलांसाठी खेळ व नवीन गोष्टी शिकण्यासाठी विविध उपक्रम राबवणे , शेतीविषयक अद्ययावत माहिती मिळवून देणाऱ्या विविध नवीन मोबाईल ॲप्सचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक गावकऱ्यांना दाखवणे.या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे निवळीतील शेतकऱ्यांना शेती विषयक अद्ययावत माहिती मिळून त्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वास कृषीदूतांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले व त्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला विविध ग्रामपंचायत सदस्य उपस्थित हाते ज्यांनी विद्यार्थ्यांना मोलाची साथ व मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी आम्ही सर्वांनीं मिळून उपस्थित सर्वांचे आभार मानले. हा संपूर्ण उपक्रम कृषीभूषण डॉ.तानाजीराव चोरगे शिक्षण व संशोधन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.निखिल चोरगे, गोविंदरावजी निकम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संकेत कदम, जिजामाता कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शमिका चोरगे, उपप्राचार्य बाळासाहेब सूर्यवंशी, आणि ग्रामीण कृषी कार्यानुभव समन्वयक प्रा. प्रशांत इंगवले यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

## विंग गावातील विविध विकास कौतुकास्पद - अध्यक्ष डॉ.शिंदे



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२१, विंग (सातारा) :** खंडाळा तालुक्यातील विंग ग्रामपंचायत ने केलेली विकास कामे यांचा पाहणी दौरा संपन्न झाला. विंग ता.खंडाळा येथे सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ. प्रियाताई शिंदे यांनी विंग गावाला भेट दिली तसेच विंग ग्रामपंचायत ने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान मध्ये खंडाळा तालुक्यात आणि सातारा जिल्ह्यात चांगले काम केले असून त्या कामाची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ.प्रियाताई शिंदे आल्या होत्या. तसेच त्यांनी सांडपाणी प्रकल्प, घनकचरा प्रकल्प, घरगुती नळाला जोडण्यात आलेले वॉटर मीटर, ओपन जीम, नाना नानी पार्क आणि विविध प्रकल्प यांची पाहणी करून माहिती घेतली तसेच विंग ग्रामपंचायत ने तालुक्यात जिल्ह्यात आणि राज्यात एक नंबर चे काम केले आहे. तसेच अध्यक्ष प्रियाताई शिंदे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग या ठिकाणी भेट दिली. त्यांना शाळा पण खूप आवडली आणि त्यांनी गावासाठी आणि शाळेसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्यासोबत ऋतुजा शिंदे सभापती महिला व बालकल्याण जिल्हा परिषद सातारा, ऋषिकेश धायगुडे पाटील सभापती समाज कल्याण जिल्हा परिषद सातारा, खंडाळा पंचायत समितीच्या सभापती छायाताई जाधव,खंडाळा पंचायत समिती सदस्या अर्चना यादव, सदस्य अतुल पवार, सदस्य वंदना धायगुडे पाटील, विश्वास शिद प्रकल्प संचालक, प्रज्ञा माने प्रकल्प संचालक जिल्हा परिषद सातारा, खंडाळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनिल वाघमारे, विस्तार अधिकारी सनिल बोडरे तालुका समन्वयक अतुल गायकवाड, उमेद बचत गटाचे अधिकारी खुडे आणि राजेंद्र चव्हाण सातारा जिल्हा परिषदेचे आणि खंडाळा तालुक्यातील सर्व अधिकारी वर्ग आणि ग्रामपंचायत विंग चे प्रशासकीय अधिकारी सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर व सर्व सदस्य ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण पडळकर आणि कर्मचारी व शासकीय कर्मचारी महिला बचत गट ग्रामस्थ महिला तरुण वर्ग उपस्थित होते.

## ठाणे येथे गावदेवी भाजी मार्केट जळून खाक तर दोघांचा मृत्यू

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.२१, ठाणे :** आज पहाटे गावदेवी भाजी मार्केट येथे लागलेल्या आगीची बातमी समजताच तात्काळ घटनास्थळी ठाणे महानगरपालिका सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी धाव घेतली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. समोर दिसणारे दृश्य अतिशय वेदनादायी होते. अनेक कष्टकरी व्यापाऱ्यांच्या घामाने उभ्या राहिलेल्या दुकानांचे झालेले नुकसान पाहून मन हेलावून गेले. गावदेवी मार्केट हे केवळ एक बाजारपेठ नाही, तर अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. इथल्या प्रत्येक व्यापाऱ्याने अथक परिश्रमातून आपला संसार उभा केला आहे. आज त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी चिंता आणि वेदना पाहून मनाला मोठी वेदना झाली.असेही हणमंत जगदाळे म्हणाले, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, पोलीस प्रशासन तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या लागलेल्या भीषण आगीत ठाणे महानगरपालिकेचे सुरक्षारक्षक काळू गाडेकर आणि ठाण्याच्या अग्निशमन दलाचे जवान सागर शिंदे या दोन कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत जखमी झालेल्या नागरिकांची रुग्णालयात जाऊन भेट घेत विचारपूस केली. या सर्व रुग्णांवर आवश्यक ते उपचार सुरु आहेत. या कठीण प्रसंगी गावदेवी मार्केटमधील प्रत्येक व्यापारी, त्यांचे कुटुंबीय आणि नागरिकांसोबत ठामपणे उभा आहे. नुकसानग्रस्तांना शक्य ती सर्व मदत मिळावी यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. असेही हणमंत जगदाळे म्हणाले, यावेळी खासदार नरेश मस्के, आमदार संजय केरकर, महापौर शर्मिला पिंपळकर, महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, उपमहापौर क्रिष्णा पाटील, शिवसेना गटनेते पवन कदम, शिवसेना नौपाडा विभागप्रमुख किरण नात्ती, भाजप ठाणे (शहर) जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांच्यासह महानगरपालिकेचे स्थानिक लोकप्रतिनिधी, महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# राज ठाकरे यांची १८ वर्ष जुन्या रेल्वे भरती प्रकरणातून निर्दोष मुक्तता

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यांना १८ वर्ष जुन्या रेल्वे भरती प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

ठाणे सत्र न्यायालयाने काल झालेल्या सुनावणीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह इतर ६ जणांना या प्रेरणाच्या आरोपातून सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. गुरुवार, दिनांक २१ मे २०२६ रोजी ठाणे जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ए.व्ही.कुलकर्णी यांनी हा निकाल देताना राज ठाकरें यांच्यासह सहा जणांना या प्रकरणातून मोठा दिलासा मिळाला आहे.

२००८ साली रेल्वे भरतीनिमित्त परीक्षेसाठी आलेल्या परप्रांतीय उमेदवारांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून कल्याण रेल्वे स्थानकावर मारहाण करण्यात आली होती. कल्याण रेल्वे स्थानकात घडलेल्या या या प्रकरणाचे पडसाद संपूर्ण देशभर उमटले होते. २००८ साली नव्यानेच स्थापन



झालेल्या राज ठाकरे यांच्या मनसेकडून मराठीच्या मुद्द्यावरून राज्यभर आंदोलने करण्यात येत होती. अश्यातच २००८ साली निघालेल्या रेल्वे भरती प्रक्रियेत उत्तर भारतीय तरुणांना रेल्वेकडून जास्त प्राधान्य देण्यात येत असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात येत होता. त्याच पार्श्वभूमीवर कल्याण रेल्वे स्थानकात रेल्वे भरतीसाठी आलेल्या उत्तर भारतीय तरुणांना मनसेच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आली होती.

या मारहाणीच्या घटनेनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह ८ मन सैनिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यातील दोन कार्यकर्त्यांचा काही वर्षांपूर्वी मृत्यू झाल्याने राज ठाकरे यांच्यासह ६ कार्यकर्त्यांवर कल्याण दिवाणी न्यायालयात सुनावणी सुरु होती त्यानंतर हे प्रकरण ठाणे जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आले.

दरम्यान या प्रकरणात राज ठाकरे यांची बाजू वकील शैलेश वाडेकर, शुभम कानडे आणि सयाजी शिंदे यांनी लढवली तर सरकारी पक्षाकडून वकील प्रमिला चव्हाण या युक्तिवाद करत होत्या. ६ मे रोजी झालेल्या सुनावणीत राज ठाकरे यांनी हे प्रकरण बनावट असल्याचे सांगून आपल्यावरील आरोप फेटाळले होते. दिनांक २१ मे २०२६ रोजी पुन्हा झालेल्या सुनावणीत मुख्य न्यायाधीश ए. व्ही. कुलकर्णी यांनी पुराव्याअभावी आणि बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत राज ठाकरे यांच्यासह सहा जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. यामुळे राज ठाकरे यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे चित्र आहे.

# कार्पेटच्या पाण्यात आंबे पिकवून विक्रीचा धक्कादायक प्रकार




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२१, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी शहरामध्ये कृत्रिम पद्धतीने आंबे पिकवून विक्री करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही व्यापाऱ्यांकडून कार्पेट धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक मिश्रित पाण्याच्या सहाय्याने आंबे पिकवले जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उन्हाळ्याच्या हंगामात मोठ्या प्रमाणात आंब्यांची विक्री होत असताना काही विक्रेते जलद नफा मिळवण्यासाठी रासायनिक प्रक्रियेचा वापर करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अशा प्रकारे पिकवलेले आंबे दिसायला आकर्षक असले तरी त्यामध्ये हानिकारक रसायनांचे अंश राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोटाचे विकार, त्वचारोग तसेच इतर गंभीर आजार उद्भवू शकतात, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग तसेच संबंधित शासकीय यंत्रणांनी बाजारपेठेत तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अशा प्रकारांना वेळीच आळा घालणे आवश्यक असून प्रशासनाने तातडीने दखल घेऊन जनजागृती व तपासणी मोहीम सुरू करावी, असे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान; 'कसं काय?' मोहिमेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलढाणा :** राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत जनजागृतीसाठी सुरू करण्यात आलेल्या कसं कायम ोहिमेला बुलढाणा जिल्ह्यात उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मोहिम ेचा शुभारंभ मुख्यमंत्री यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आला. यावेळी कसं काय? या जनजागृतीपर गीताचे तसेच विशेष पोस्टर्सचे प्रकाशन करण्यात आले.



कार्यक्रमास उपमुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, प्रधान सचिव निपुण विनायक तसेच मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. ग्रामीण महाराष्ट्रात आरोग्य जागृतीची नवी चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न या मोहिमेद्वारे करण्यात येत असून गावागावांत आता कसं काय? हा प्रश्न आरोग्य जनजागृतीचा संदेश देत आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या पुढाकारातून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. या माध्यमातून स्वच्छता, पोषण, निरोगी जीवनशैली, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा तसेच आरोग्य सक्षमीकरण याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. कसं काय या विशेष गीताच्या माध्यम ातून आरोग्यविषयक संदेश आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अम ोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, सम ुदाय आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत गावागावांत या मोहिमेची व्यापक प्रसिद्धी केली जात आहे.

विविध आरोग्य शिबिरे, ग्रामसभा, जनजागृती कार्यक्रम तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान ग्रामीण भाग अधिक निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदायी करण्याच्या दृष्टीने म हत्त्वपूर्ण ठरणार असून बुलढाणा जिल्हा या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरसावले आ. सुधीर मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर सध्या युरिया व डीएपी खतांचा तुटवडा तसेच शेतीकामांसाठी आवश्यक डिझेल उपलब्धतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आगामी पेरणी हंगामाच्या पार्श्वभूमीवर या अडचणींमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असताना त्यांच्या मदतीसाठी आ. सुधीर मुनगंटीवार सरसावले आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ ऐकून न घेता त्या तातडीने मार्गी लागाव्यात यासाठी त्यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत त्वरित उपाययोजनांची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत पुन्हा एकदा त्यांनी संवेदनशील लोकप्रतिनिधीची भूमिका अधोरेखित केली आहे.

आगामी पेरणी हंगामाच्या पार्श्वभूम ीवर जिल्ह्यातील शेतकरी शेतीच्या तयारीत व्यस्त असताना अनेक कृषी केंद्रांमध्ये खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे. मुल तालुक्यातील ३२ कृषी केंद्रांपैकी केवळ २५ केंद्रांमध्ये युरिया आणि फक्त ९ केंद्रांमध्ये डीएपी उपलब्ध असल्याची माहिती निवेदनात देण्यात आली आहे. बल्लारपूर तालुक्यातील १५ कृषी केंद्रांपैकी ९ केंद्रांमध्ये युरिया तर ७ केंद्रांमध्ये डीएपी उपलब्ध आहे. पोंभूर्णा तालुक्यातील ३७ कृषी केंद्रांपैकी २६ केंद्रांमध्ये युरिया आणि केवळ ९ केंद्रांमध्ये डीएपी उपलब्ध आहे. तसेच चंद्रपूर तालुक्यातील ६५ कृषी केंद्रांपैकी ३९ केंद्रांमध्ये युरिया आणि फक्त १९ केंद्रांमध्ये डीएपी खत उपलब्ध असल्याने अनेक शेतकऱ्यांना खतासाठी विविध कृषी केंद्रांवर फेऱ्या माराव्या लागत आहेत.

आ. मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नम ूद केले आहे की, अनेक भागांमध्ये कृत्रिम खत टंचाई निर्माण केली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढत असून वेळेवर पेरणी आणि शेतीची कामे होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. पावसाळ्यापूर्वी शेतीची महत्त्वाची कामे पूर्ण करणे आवश्यक असताना खत उपलब्ध नसल्यास उत्पादनावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील सर्व कृषी केंद्रांमध्ये युरिया आणि डीएपी खताचा पुरेसा साठा तात्काळ




उपलब्ध करून द्यावा तसेच खतांचा काळाबाजार आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर डिझेल उपलब्धतेचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पाण्याचे पंप, जनरेटर, थ्रेशर आणि इतर कृषी यंत्रसामग्री चालविण्यासाठी मोठ्या प्रम ाणात डिझेलची गरज असते. मात्र अनेक पेट्रोल पंप चालकांकडून शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देण्यास नकार दिला जात असल्याने शेतीची कामे अडचणीत आली आहेत. दुर्गम आणि जंगल परिसरातील शेतकऱ्यांसाठी ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

ग्रामीण भागातील अनेक लहान आणि मध्यम शेतकऱ्यांकडे सर्व यंत्रसामग्री पेट्रोल पंपापर्यंत नेण्याची सुविधा नसल्याम ुळे त्यांना कॅनमध्ये डिझेल नेण्याशिवाय पर्याय राहत नाही. अनेक भागांमध्ये विजेचा अभाव असल्याने डिझेल पंपाच्या सहाय्याने शेतीला पाणी द्यावे लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आधार कार्ड, सातबारा किंवा इतर ओळखपत्रांच्या आधारे डिझेल कॅनमध्ये उपलब्ध करून द्यावे आणि प्रत्येक पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल राखीव कोटा ठेवावा, अशी मागणीही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.

# उत्तरशिवगांव पेटले; गुरचरण वाचवण्यासाठी १४ गाव रस्त्यावर

## आ.मोरेंच्या हस्तक्षेपाने मोजणी स्थगित; 'एक इंचही जमीन देणार नाही' भूमिपुत्रांचा एल्गार



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, उत्तरशिवगांव (ठाणे) :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १४ गावांमधील उत्तरशिव गावातील गुरचरण जमिनीवर प्रस्तावित म्हाडा प्रकल्पासाठी बुधवारी करण्यात येणारी जमीन मोजणी अखेर स्थगित करण्यात आली. भूमिपुत्रांच्या तीव्र विरोधानंतर कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी थेट म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून धाडसी कारवाई थांबवण्यास भाग पाडले. त्यामुळे परिसरात मोठा दिलासा व्यक्त करण्यात आला आहे. मात्र जमीन जबरदस्तीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर रस्त्यावर उतरण्याचा इशारा भूमिपुत्रांकडून देण्यात आला आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील उत्तरशिव गावात शासनाकडून म्हाडा प्रकल्प राबविण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक जमिनीची मोजणी करण्यासाठी अधिकारी दाखल झाले होते. यामध्ये ठाणे तहसीलदार यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी देखील होते. मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता जबरदस्तीने जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न होत असल्याच्या आरोप करत १४ गावांतील भूमिपुत्र मोठ्या संख्येने एकत्र आले. ठाणे व रायगड जिल्ह्यातील भूमिपुत्रांनी एकजूट दाखवत प्रशासनाविरोधात जोरदार शक्तिप्रदर्शन उत्तरशिव येथे केले आहे.

परिस्थिती तणावपूर्ण होत असताना आमदार राजेश मोरे यांनी तातडीने हस्तक्षेप करत म्हाडाचे वरिष्ठ अधिकारी संजय जयस्वाल यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. भूमिपुत्रांचा विरोध असताना कोणत्याही परिस्थितीत सर्वेक्षण होऊ देणार नाही. नागरिकांशी चर्चा करून आवश्यक सुविधा देण्याबाबत निर्णय झाल्यानंतरच पुढील भूमिका घेतली जाईल, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या मध्यस्थीनंतर प्रशासनाने मोजणीची कारवाई थांबवून माघार घेतली आहे.

**नागरिकांची भूमिका**

१४ गाव नवी मुंबई महानगरपालिकेत आहेत. त्यामुळे आमची जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात राहू देत. आमच्या पुढील १४ गावातील सुविधा महापालिकेच्या माध्यमातून सुटतील.

**– प्रतीक्षा पाटील (नगरसेविका, १४ गाव)**

---------------------------------------

आज निर्णय झालेला आहे आणि जमीन मोजणी थांबली आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी आमदार राजेश मोरे यांना उपस्थितांच्या समोर असा शब्द दिला आहे की, आजची मोजणी थांबवली जाईल आणि आम्ही बैठकीला तयार आहोत. बैठक झाल्यानंतर पुढील दिशा ठरवू. परंतु आमचा, नागरिकांचा आणि १४ गावांचे असे ठाम म्हणणे आहे की, एकही इंच जमीन हि कोणत्याही प्रकल्पाला द्यायची नाही.

**– लक्ष्मण पाटील (अध्यक्ष, १४ गाव सर्वपक्षीय विकास समिती)**

**पुढील बैठक :-** यासंदर्भात शासन स्तरावर लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीला म्हाडा, नवी मुंबई मनपा आयुक्त, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांची उपस्थिती असणार आहे. त्यामुळे या बैठकीकडे भूमिपुत्रांचे लक्ष लागले आहे.


**पार्श्वभूमी :-** १४ गावांमध्ये याआधी शासनाने दिलेल्या जमिनींवर म्हाडाचे प्रकल्प राबविले आहेत. यामध्ये भंडार्ली, गोठेघर यांचा समावेश आहे. म्हाडाने लाभार्थींना ताबा दिला परंतु त्यांना कोणत्याही जीवनावश्यक सुविधा देखील शासन देऊ न शकल्याने त्यांनी उत्तरशिव येथे नाराजी व्यक्त केली आहे. २०२३ साली तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठक झाली होती.

**आंदोलनात उपस्थित मान्यवर व ग्रामस्थ :-** या आंदोलनात माजी आमदार सुभाष भोईर, ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक बाबाजी पाटील, नवी मुंबई महानगरपालिका नगरसेवक भरत भोईर, नगरसेवक शशिकांत भोईर, नगरसेवक प्रतीक्षा पाटील, नगरसेवक सविता साबळे, संतोष केणे, निलेश पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, तहसीलदार, १४ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, रमेश पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य, सरपंच उमेश गायकर, वाकलन, रामनाथ पाटील, राम भोईर, गणेश जयपाल, माजी उपसभापती भरत भोईर, डायघर पंचक्रोशी समिती अध्यक्ष संतोष पाटील, तालुकाप्रमुख गुरुनाथ वालीलकर, जीवन वालीलकर, गुरुनाथ पाटील, कैलाश शेठ पाटील उपस्थित होते. तसेच चौदा गावातील ग्रामस्थ आणि उत्तरशिव येथील ग्रामस्थांसह प्रशासनातील म्हाडा अधिकारी शिंदे यांच्यासह हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी शहर, राहुरी खुर्द परिसरात कोंबडी अवशेषांचा विळखा

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२१, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी शहर तसेच राहुरी खुर्द परिसरातील काही चिकन विक्रेत्यांकडून कोंबडीचे डोके, पाय, पंख व इतर निरुपयोगी अवशेष उघड्यावर टाकले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

विशेषतः मुळा नदीच्या तीरालगत असलेल्या ज्ञानेश्वर उद्यान परिसराच्या कोपऱ्यावर तसेच नगर–मनमाड राज्य महामार्गालगत मोठ्या प्रमाणात कोंबडीचे अवशेष फेकले जात असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी, नागरिक व विद्यार्थी ये–जा करीत असतात. मात्र उघड्यावर टाकण्यात आलेल्या अवशेषांमुळे निर्माण होणारा उग्र वास नागरिकांना सहन करावा लागत असून परिसरातील स्वच्छतेचा ही प्रश्न गंभीर बनला आहे.

हवेमध्ये पसरणाऱ्या जंतू व विषाणूंमुळे संसर्गजन्य आजार वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही चिकन विक्रेते राहुरी खुर्द परिसरातील मांजर पाळणाऱ्या नागरिकांना देखील कोंबडीचे मुंडके, पाय, पंख व इतर अवशेष देतात. हे अवशेष मांजरे विविध ठिकाणी, घरांच्या परिसरात तसेच अंगणात घेऊन फिरत असल्याने दुर्गंधीबरोबरच अस्वच्छता वाढत आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे याबाबत तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून सार्वजनिक ठिकाणी कोंबडीचे अवशेष टाकण्यास कठोर बंदी घालावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने संबंधित प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व प्रवासी व्यक्त करीत आहेत.

# दिव्यांग बांधवांना योजनांपासून वंचित ठेवू नका; अपंग क्रांती संस्थेचे प्रशासनाला निवेदन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, पालघर :** दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करून विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी अपंग क्रांती संस्था (रजि.) पालघर जिल्हाच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच तहसीलदारांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. १५ मे २०२५ रोजी शासनाने दिव्यांग बांधवांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असले तरी अनेक दिव्यांगांना अद्याप UDID कार्ड मिळालेले नाही. तसेच विविध तांत्रिक कारणांमुळे संजय गांधी निराधार योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गरजू दिव्यांग बांधव शासनाच्या लाभापासून वंचित राहत असल्याची खंत संस्थेने व्यक्त केली आहे.



अपंग क्रांती संस्थेचे जिल्हाध्यक्ष सुनील गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या या निवेदनात प्रशासनाने तातडीने विशेष शिबिरे आयोजित करून दिव्यांगांची नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संजय गांधी निराधार योजनेसह विविध योजनांमधून वंचित राहिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांना प्राधान्याने लाभ द्यावा, असेही संस्थेने म्हटले आहे. याशिवाय तलाठी, ग्रामसेवक, आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून गावागावातील दिव्यांगांचे सर्वेक्षण करून माहिती संकलित करावी, अशी सूचना करण्यात आली आहे. शासन निर्णयांनुसार लाभ मिळण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी जसे की PASS/FAIL, ई–केवायसी, आधार लिंकिंग आदी त्रुटी तात्काळ दुरुस्त करून लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण तालुक्यात किती दिव्यांगांना योजनांचा लाभ मिळाला, किती जणांचे UDID कार्ड प्रलंबित आहेत आणि किती जण लाभापासून वंचित आहेत याची सविस्तर माहिती जाहीर करून विशेष अभियान राबवावे, अशी मागणी अपंग क्रांती संस्थेने प्रशासनाकडे केली आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष सुनील गुप्ता, उपाध्यक्ष संजय भानुशाली तसेच कार्याध्यक्ष विलास भणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संस्था प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत आहे.

# प्रज्ञाशोध परीक्षा, नवोदय परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये श्रीराज सुहास महांगरे चे यश

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२१, विंग (सातारा) :** विंग ता.खंडाळा जि.सातारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग चा विद्यार्थी श्रीराज सुहास महांगरे याने पुढील प्रज्ञाशोध परीक्षा, नवोदय परीक्षा, आणि शिष्यवृत्ती परीक्षा या सर्व परीक्षा मध्ये चांगले मार्क मिळवून उत्तीर्ण झाला आहे.



श्रीराज हा एक सर्व सामान्य कुटुंबातील मुलगा असून मेहनत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले आहे त्याला आजी आदर्श अंगणवाडी सेविका मंगल विठ्ठल महांगरे आजोबा विठ्ठल कृष्णा महांगरे आई वडील आणि शाळेतील मुख्याध्यापक आणि त्यांचे सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन मिळाले सर्व परीक्षा चांगल्या मार्कांने पास झाल्याबद्दल सर्व स्थरातून श्रीराज सुहास महांगरे ह्यांचे खूप खूप कौतुक अभिनंदन होत आहे. तसेच पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा...

# थोडक्यात

## न.मु.म.पा. समोरील डिव्हायडरवर डेंजर झोन सिग्नलची मागणी; अपघातांची मालिका सुरू



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२१, बेलापूर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका समोरील पाम बीच मार्गावरील रस्त्याच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरवर डेंजर झोन सिग्नल नसल्यामुळे त्या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याची बाब समोर आली आहे. विशेषतः रात्रीच्या सुमारास डिव्हायडर स्पष्ट दिसून न आल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत असून दुर्घटनांचे प्रमाण वाढत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.यासंदर्भात संबंधित वाहतूक नियंत्रण कक्षाने तातडीने लक्ष घालून त्या ठिकाणी डेंजर झोन सिग्नल, रिफ्लेक्टर तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नजर हटी, दुर्घटना घटी ही म्हण येथे प्रत्यक्षात अनुभवायला मिळत असल्याचे स्थानिकांनी म्हटले आहे.याच ठिकाणी नुकतीच महावृत्त वृत्तपत्राचे पत्रकार कल्याणराव हनवते यांच्यासोबत दुर्घटना घडली. नुकताच पहाटे साधारण ३ वाजताच्या सुमारास ते सीवूड्स ते सीबीडी बेलापूर रेल्वे ब्रिज बसस्टॉपच्या दिशेने जात असताना डिव्हायडर न दिसल्यामुळे त्यांचा अपघात झाला. या घटनेत त्यांच्या हात–पायाला किरकोळ दुखापत झाली असून छातीला मुका मार लागला आहे. त्यांनी हेल्मेटचा वापर केल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जात आहे. सध्या त्यांची प्रकृती सुधारत असली तरी वाहनाचे नुकसान झाले आहे.या घटनेनंतर संबंधित प्रशासनाने तातडीने त्या परिसराची पाहणी करून डिव्हायडरवर डेंजर झोन सिग्नल, फ्लुरोसंट रिफ्लेक्टर आणि इशारा फलक बसवावेत, अशी मागणी नागरिक व वाहनचालकांकडून केली जात आहे. वेळेत उपाययोजना केल्यास भविष्यातील दुर्घटना टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कथित बनावट जन्म-मृत्यू दाखला प्रकरणाची पोलीसांकडून चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी – मुझफ्फर हुसैन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२१, मिरा–भाईंदर :** मिरा–भाईंदर शहरात कथित बनावट जन्म व मृत्यू दाखल्यांचे प्रकरण समोर आल्यानंतर संपूर्ण शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणात संशयास्पद दाखले जारी करण्यात आल्याची माहिती समोर येत असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी पोलीस विभागामार्फत करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस नेते मुझफ्फर हुसैन यांनी केली आहे. तसेच संबंधित १५०० संशयित नावांची यादी वृत्तपत्रांमध्ये तसेच मिरा–भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.

यासंदर्भात मुझफ्फर हुसैन यांनी म्हटले आहे की, मिरा–भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी संबंधित संशयित दाखल्यांची संपूर्ण माहिती अधिकृतरित्या पोलिसांकडे सुपूर्द करून रितसर तक्रार नोंदवावी व FIR दाखल करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी. त्यानंतर पोलिसांनी सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी करून, या प्रकरणात जर कोणते अधिकारी, कर्मचारी अथवा इतर संबंधित व्यक्ती दोषी आढळून आले, तर त्यांच्याविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करून दोषींना तातडीने अटक करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच संशयित नावांची यादी सार्वजनिक केल्यास नागरिकांमध्ये तसेच प्रशासनामध्ये कोणत्याही प्रकारची दिशाभूल होणार नाही. खोटे दस्तऐवज तयार करणे, बेकायदेशीर ओळखपत्रे बनविणे तसेच बोगस मतदानासारख्या गैरप्रकारांना आळा घालण्यास मदत होईल. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी आणि प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास कायम राखण्यासाठी संबंधित माहिती सार्वजनिक करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संपूर्ण सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी मुझफ्फर हुसैन यांनी केली आहे.

## सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकावर पार पडले मॉक ड्रील

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** स्थानकाचा ताबा घेणे आणि बॉम्ब ठेवल्याची धमकी यांसारख्या आपत्कालीन प्रसंगांना सामोरे जाण्याची सिद्धता तपासण्याकरिता नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र.१ बेलापूर ते पेंधरवरील सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकावर व्यापक आपत्कालीन प्रतिसाद मॉक ड्रील दि.२० मे २०२६ रोजी पार पडले. नवी मुंबई पोलीसांचे शीघ्र प्रतिसाद दल (क्यूआरटी टीम) आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून सदर मॉक ड्रील पार पाडण्यात आले.संघटनांतर्गत समन्वय, प्रतिसाद कार्यक्षमता, निर्वासन प्रक्रिया, दळणवळण शिष्टाचार आणि मेट्रो स्थानकांवरील सुरक्षाविषयक आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्याची एकंदर सिद्धता, या बाबींचे मूल्यमापन करून बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने मॉक ड्रील पार पाडण्यात आले.

मॉक ड्रील दरम्यान स्थानकाचा अनधिकृतरीत्या ताबा घेणे आणि स्थानकावर स्फोटक वस्तू ठेवल्याचा संशय, या परिस्थितीचे सदृशीकरण (डळाींश्रीांळेप) करण्यात आले. आपत्कालीन प्रतिसाद कार्यान्वित झाल्यावर प्रशिक्षित जवानांनी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढणे, स्थानक विलगीकरण, धमकीची सत्यता पडताळून पाहणे, गर्दी व्यवस्थापन आणि समन्वित डावपेचात्मक प्रतिसाद उपाययोजना राबविण्यास सुरूवात केली.

मॉक ड्रील दरम्यान पोलीस कर्मचारी आणि मेट्रो कर्मचाऱ्यांसह क्यूआरटी टीमने जलद हालचाल आणि एककालिक कार्यकारी प्रतिसाद यांचे प्रात्यक्षिक केले. या डील अंतर्गत आपत्कालीन दळणवळण प्रणाली, प्रवेश नियंत्रण उपाययोजना कार्यान्वित करणे आणि वैद्यकीय व आपत्कालीन प्रतिसाद पथकांबरोबर समन्वय साधणे या बाबींचा देखील समावेश होता.या प्रसंगी उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकारी, क्यूआरटी टीम, सिडको आणि महा मेट्रोचे अधिकारी यांनी सहभागी दलांनी दाखवलेल्या व्यावसायिक कौशल्य व त्वरित प्रतिसाद याबद्दल त्याची प्रशंसा केली.

या मॉकड्रीलद्वारे कार्यकारी सिद्धता पडताळण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रवासी आणि पायाभूत सुविधा सुरक्षेकरिता कराव्या लागणाऱ्या आपत्कालीन उपाययोजनांमध्ये सुधारणा करण्यास मदत झाली. सुरक्षाविषयक आव्हानांचा सामना करण्याकरिता लागणाऱ्या उच्चस्तरीय सिद्धतेसह, मेट्रो प्रवाशांच्या मनामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास अशा प्रकारची मॉक ड्रील उपयुक्त असल्याचे मत उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.